# मालेगाव महानगरपालिका,मालेगाव

## आरोग्य अधिकारी कार्यालय

☎ (०२५५४) २३१८०५, (Ex.२१६) फॅक्स २३०८१४

विषय:-शहरी आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी पध्दतीने आशा स्वयंसेविकाची तात्पुरती मानधन तत्तावर भरती बाबत.

संदर्भ:-NUHM PIP-२०२३/२४ मंजुर आराखडा.

जाहीर सुचना

मालेगाव महानगरपालिका, मालेगाव कार्यक्षेत्रात एकात्मिक आरोग्य व कुंटुब कल्याण सोसायटी, राष्ट्रीय आरोग्य अभियान (NUHM) कार्यक्रम अन्वये म.शासन मार्गदर्शनानुसार कंत्राटी पध्दतीने मानधन स्वरुपात **आशा स्वयंसेविकाची पदभरती दि.२६/०७/२०२३ ते दि.२८/०७/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० वाजपर्यत** फार्म स्विकारणी केली जाईल **फार्म तपासणी** अंती पात्र उमेदवाराची दि.०२/०८/२०२३ वार बुधवार रोजी थेट मुलाखतीदवारे **(Walk in Interview)** भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

त्यासाठी इच्छुक उमेदवाराचे अर्ज सकाळी १० ते ०५ या वेळेत **जुने सभागृह,मालेगाव महानगरपालिका, मालेगाव** येथे स्विकारण्यात येतील.

| अ.क्रं | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | वय | ठोक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | आशा स्वयंसेविका (कंत्राटी) | ७३ | 10 वी पास उच्च शिक्षित | २० ते ४५ | म.शासनाने ठरवुन दिल्याप्रमाणे |

**टिप:-**

१) आरक्षण मधील योग्य व पात्र उमेदवार न मिळाल्यास म.शासन मार्गदर्शन व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. सदरची पदे निव्वळ कंत्राटी तात्पुरत्या स्वरुपाची आहे ही पदे आस्थपनेची नाही.

२) मानधन तत्तावर एकत्रित मनपाने ठरविलेले मानधन देण्यात येईल.

३)उमेदवाराची निवड शासन धोरणेनुसार करण्यात येईल उच्च शैक्षणिक पात्रता धारक व अनुभवी उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना ११ महिन्याकरीता कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नियुक्ती दिली जाईल कामाचा गुणवत्ता पाहुन पुढील मुदती बाबत विचार करण्यात येईल.

४)अर्जाची छानंनी करण्यात येईल व छानणीत पात्र असलेल्या उमेदवाराची मुलाखत घेण्यात येईल.

५)मुलाखतीसाठी प्रवास भत्ता व इतर अनुज्ञेय दिले जाणार नाही.

६) सदर आशा स्वयंसेविकाचे पद कमी अथवा जास्त होऊ शकतो यांचे सर्व अधिकारी मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी राखुन ठेवले आहेत.

७) आशा स्वयंसेविका यापदासाठी म.शासनाच्या मार्गदर्शान्वये १० वी पास व वय वर्षे २० ते ४५ पर्यतचे उमेदवार पात्र असतील याची सर्व महिला उमेदवारांनी घ्यावी.

**इच्छुक उमेदवारांनी फार्म घेऊन खालील माहिती व कागदपत्रासह अर्ज करावे.**

१)पदाचे नाव २) उमेदवाराचे पुर्ण नाव ३) पत्ता मो.नंबर ई-मेल आयडी ४) जन्म तारीख ५) शैक्षणिक पात्रता उत्तीर्ण वर्ष प्राप्त गुणाची टक्केवारी ६) शासकीय व निमशासकीय विभागात कामाचा अनुभव दाखला ७) अर्जदारांनी अर्जासोबत गुणपत्रिका व प्रमाणपत्र उच्च शैक्षणिक अर्हता धारक असल्यास त्याची गुणपत्रिका ८) पासपोर्ट साईज फोटो सादर करणे आवश्यक आहे.

२४/७/२३

आरोग्याधिकारी

मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

CamScanner